**ठळक बातम्या**

- मुंबईतलं पहिलं शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याकडून दावोस इथं घोषणा

- छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात नऊ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

- ग्रीनलँड ताब्यात घेण्याच्या अमेरिकेच्या हालचालींना रशियाचा विरोध

**आणि**

- भारत विरुद्ध न्युझीलंड यांच्यातल्या पाच टी ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेला आजपासून नागपूरमधे सुरुवात

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दावोस दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मुंबईतील पहिलं शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा केली. नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळवण्याचा प्रयत्न केला जात होता. त्या मिळाल्यानंतर तिसऱ्या मुंबईतल्या पहिल्या शहराची घोषणा करण्यात येत आहे, अनेक गुंतवणूकदारांनी यात गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं

- **- - होल्ड बाईट मुख्यमंत्री - - -**

स्वित्झर्लंडमध्ये जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने करण्यात येणारा दावोस दौरा हा भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळवण्यासाठीचा महत्त्वाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. दावोस दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्र्यांनी अनेक सामंजस्य करार केले. यात युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक, अर्बन फ्युचर्स कलेक्टिव्ह-लंडन, आयसीसीआय-इटली, अँलाँग ट्युनिंग इन्स्टिटट्यूट, नॉर्वेजीयन जिओ टेक्निकल इन्स्टिटट्यूट, अर्बन प्लॅनिंगमधील सुबाना जुराँग यांच्यासोबतच्या करारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात भारत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रसार करण्याचा प्रयत्न करत आहे, असं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. ते दावोस इथं जागतिक आर्थिक मंचाच्या नो रेफरी या सत्रात बोलत होते. ग्राफीक प्रोसेसिंग युनिटची उपलब्धता असणं एआयच्या प्रसारासाठी आवश्यक आहे. सार्वजनिक खासगी भागीदारीद्वारे सरकार ही गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असल्याचं वैष्णव म्हणाले. आतापर्यंत ३८ हजार जीपीयू पॅनलमधे समाविष्ट केल्याचं त्यांनी सांगितलं. या सत्रात मायक्रोसॉफ्टचे अध्यक्ष ब्रॅड स्मिथ, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्तिना जॉर्जव्हा यांनी भाग घेतला.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासासाठी मोठी यंत्रणा नाही तर लहान लहान मॉडेल्स उपयोगी पडतील असं दावोस इथं प्रसारमाध्यमांना दिलेल्या मुलाखतीत अश्विनी वैष्णव म्हणाले. भारतात १२ एआय मॉडेलची बांधणी केली जात असून हे विविध उद्योग क्षेत्रांच्या गरजा भागवण्यासाठी सक्षम आहेत, असं ते म्हणाले. सेमिकंडक्टर निर्मिती, पायाभूत सुविधा तसंच ऊर्जा क्षेत्रातल्या एआयच्या मूल्य साखळीच्या प्रगतीचाही वैष्णव यांनी यावेळी उल्लेख केला.

**<><><><><>**

भारतानं कोट्यवधी घरं आणि शेतकरी यांना स्वस्त सौर ऊर्जा उपलब्ध करून देण्यात मोठं यश मिळवलं आहे, असं आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे महासंचालक आशिष खन्ना यांनी दावोस इथल्या जागतिक आर्थिक मंचाला सांगितलं. सूर्यघर छत योजना १० कोटी घरांपर्यंत पोहोचवण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले. प्रधानमंत्री कुसुम योजनेद्वारे शेतकऱ्यांना सौरऊर्जेच्या माध्यमातून शेती करण्यासाठी सहाय्य्य केलं जातं आणि व्यावहारिक प्रारूप सादर केलं जातं. कमी खर्चामध्ये शेती करण्याच्या दृष्टीनं इतर देश या प्रारूपाचा अवलंब करू शकतात, असं खन्ना म्हणाले.

**<><><><><>**

दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी सर्व देशांनी परस्पर सहकार्य करण्याची गरज पहिल्यापेक्षा अधिक तीव्रतेनं निर्माण झाली आहे, असं परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत स्पेनचे परराष्ट्रमंत्री जोस मॅन्युएल अल्बरेस ब्युनो

यांच्यासोबत चर्चेला सुरुवात करताना ते बोलत होते. भारत आणि स्पेन हे दोन्ही देश दहशतवादानं पीडित आहेत. सध्या जग मोठ्या बदलाला सामोरं जात आहे आणि सर्व देशांनी दहशतवादाप्रती शून्य सहिष्णुता धोरण अवलंबलं पाहिजे, असं ते म्हणाले. पुढच्या महिन्यात भारत आर्टिफिशियल इंटेलिजेंस इम्पैक्ट समिट २०२६चं आयोजन करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन तसंच  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मणिपूर, मेघालय आणि त्रिपुरा या राज्यांच्या स्थापना दिनानिमित्त तिथल्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. संस्कृती, क्रीडा, निसर्ग यांची आवड असलेल्या मणिपूरच्या  जनतेमुळे  देशाचा विकास अधिक वैभवशाली झाला आहे, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

परंपरा आणि आधुनिकता यांचा संगम असलेला त्रिपुरा राज्याचा प्रवास देशाच्या विकासगाथेला गती देत आहे, असं मोदी यांनी आपल्या संदेशात नमूद केलं आहे. मेघालय राज्याचं निसर्ग सौंदर्य सर्वत्र वाखाणलं जात आहे. भविष्यात हे राज्य विकासाची  नवीन उंची गाठेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात नऊ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. यातल्या एका महिलेनं जिल्ह्यातल्या इतर नक्षलवाद्यांना शरण येण्याचं आवाहन केलं आहे. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक वेदव्रत सिरमौर यांनीही या परिसरातल्या नक्षलवाद्यांना आत्मसमर्पण करण्याचं आवाहन केलं आहे.  समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हा आणि सरकारच्या पुनर्वसन धोरणाचा लाभ  उठवा, असं ते म्हणाले.

छत्तीसगढमध्ये गेल्या दोन वर्षांत दोन हजारहून अधिक नक्षलवाद्यांनी शस्त्रं खाली ठेवून मुख्य प्रवाहधारित सामील व्हायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

आसामच्या कार्बी अंगलोंग जिल्ह्याच्या एका दुर्मिळ गावात विहीर खणताना तीन मजुरांचा मृत्यू झाला. दिसमा गावात काल संध्याकाळी हे तीन मजूर खड्ड्यात पडले. बचाव दलानं त्यांना तातडीनं बाहेर काढून दिपू इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केलं

असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. जिल्हा प्रशासन या दुर्घटनेची चौकशी करत आहे.

**<><><><><>**

विविध मागण्यांसाठी निघालेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा लाँग मार्च काल महाराष्ट्रातल्या पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. जिल्हाधिकारी कार्यालयाला आंदोलकांनी आज घेराव घातला असून ठिय्या आंदोलन सुरू केलं आहे. मागण्यांचं निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिलं असून प्रशासन चर्चेसाठी तयार असल्याचं आमदार विनोद निकोले यांनी सांगितलं.

- **- - होल्ड बाईट निकोले - - -**

- **<><><><><>**

केंद्र सरकारने भारतीय लघु उद्योग विकास बँक सिडबीमध्ये ५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला मंजुरी दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे २५ लाख ७५ हजारांपेक्षा जास्त सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगातल्या लाभार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. हे भांडवल वित्तीय सेवा विभागाच्या माध्यमातून तीन टप्प्यांमध्ये गुंतवलं जाणार आहे. पहिला तीन हजार कोटी रुपयांचा टप्पा चालू आर्थिक वर्षात, त्यानंतरचे टप्पे पुढच्या दोन आर्थिक वर्षात गुंतवले जातील.

**<><><><><>**

ग्रीनलँड हा देश ताब्यात घेण्याच्या हालचाली अमेरिकेनं सुरू केल्यानंतर रशियानं त्याचा विरोध केला आहे.  ग्रीनलँड हा डेन्मार्कचा नैसर्गिक भाग नसून वसाहतवादाच्या हव्यासामुळे संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेच्या धोरणाचं उल्लंघन केल्याचं मत रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लॅव्हरोव्ह यांनी व्यक्त केलं आहे.  एका वार्ताहर परिषेत ते म्हणाले की, ग्रीनलँड ही डेन्मार्क ऐतिहासिक वसाहत असून तो २० शतकाच्या मध्यात डेन्मार्कशी संलग्न झाला होता. दरम्यान, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इम्यान्यूयल मॅक्रोन यांनीही या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी युरोपियन देशांच्या नेत्याची तातडीची बैठक पॅरिसमध्ये बोलावली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी मात्र या बैठकीला उपस्थित न राहण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

भारत विरुद्ध न्युझीलंड यांच्यातली पाच टी ट्वेंटी सामन्यांची मालिका आजपासून सुरु होत आहे. या मालिकेतला पहिला सामना आज संध्याकाळी सात वाजता नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर होणार आहे. सुर्यकुमार यादव याच्या नेतृत्वाखालील भारतीय चमूमध्ये इशान किशन तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी येणार आहे.

**<><><><><>**

लष्करी क्षमता ही देशाच्या शक्तीचं द्योतक असून ती वापरण्याची मानसिकताही महत्त्वाची असल्याचं  एअर चिफ मार्शल अमर सिंग प्रित सिंग यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत राष्ट्रीय सुरक्षा प्राधान्य या विषयाच्या अनुषंगानं २२ व्या सुब्रतो मुखर्जी परिसंवादात बोलत होते.

//<><><><><>//